इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

संशोधक

सप्टेंबर
१९८६

वर्ष ५४
अंक ३

संपादक

डॉ. प्र. न. देशपांडे
डॉ. मु. ब. शहा
श्री. अतुल जोशी

वार्षिक वर्गणी
२५ रुपये

अंकाचे मूल्य
७ रुपये

॥ श्रीविश्वनाथो विजयते ॥

राजवाडे मंडळ प्रकाशने

मंडळाकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या ग्रंथांची यादी

	पृष्ठे	रुपये
१. राजवाडे मराठी धातुकोश	३७०	३०
२. राजवाडे नामादी व्युत्पत्तिकोश	३५०	३०
३. समर्थ शिवाजी अन्योन्य संबंध (भा. रा. भट)	१०९	५
४. ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे संस्कृत रूपांतर (वि. का. राजवाडे)	१८३	७
५. राजस्थान-महाराष्ट्र संघर्ष (शु. पु. जोशी)	३००	१२
६. राजवाडे चरित्र (भा. वा. भट)	६३२	५०
७. मराठ्यांच्या इतिहासाची साधने (मो. रा. जोशी)	६६०	५०
८. ऋग्वेदातील ज्योतिषमूलक कालनिर्णायक गमके	१००	७
९. संस्कृत भाषेचा उलगडा (वि. का. कुळकर्णी)	२१०	१०
१०. जानकी सैंवर (सं. द. रा. भट)	२८८	२०
११. आज्ञापत्र (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित		२०
१२. अमृतानुभव (ऑफसेट प्रिंट) मूळ हस्तलिखित		४१
१३. योगचिंतामणी (ऑफसेट प्रिंट)		४१
१४. वेडिया नागेश (सं. डॉ. मु. ब. शहा)		१०
१५. छत्रपतींची १०९ कलमी बखर (सं. डॉ. प्र. न. देशपांडे)		१०
१६. ज्ञानेश्वरी पदकोश (श्री. शिवाजीराव भावे)		१००
१७. संशोधक, " सुवर्ण महोत्सवी अंक "	३००	४०

विक्रीसाठी ठेवलेले इतर ग्रंथ

१. छ. शिवाजीमहाराजांची पत्रे (डॉ. प्र. न. देशपांडे)	३००	६५

विशेष सवलत : वरील १८ पुस्तकांचा संच किंमत रुपये ५४८ चा केवळ रुपये ४०० ला मिळेल. २ अगर अधिक ग्रंथ घेणाऱ्यास १५ टक्के कमिशन. काही ग्रंथाच्या प्रती अगदीच मर्यादित. टपाल खर्च वेगळा लागेल.

संशोधक त्रैमासिक : इतिहास संस्कृती संशोधनाला वाहिलेले दर्जेदार त्रैमासिक गेली ५२ वर्षे प्रकाशित होत आहे. वार्षिक वर्गणी फक्त रु. १५/– प्रत्येक अंक किंमत रु. ५ – ५२ वर्षांतील उपलब्ध असलेल्या सर्व अंकांचा संच केवळ रु. ३००/– त उपलब्ध (त्यात सुवर्ण महोत्सवी अंक रु. ४०/–, योगचिंतामणी रु. ४१/–, आज्ञापत्र रु. २०/-समाविष्ट.)

चिटणीस,

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ व
भारतीय इतिहास अनुसंधान परिषद यांनी
अनुदान देऊन पुरस्कृत केलेले त्रैमासिक

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे
संशोधन मंडळाचे त्रैमासिक

संशोधक

सप्टेंबर १९८६ — वर्ष ५४ अंक ३

संपादक

डॉ. प्र. न. देशपांडे
डॉ. मु. ब. शहा
श्री. अतुल जोशी

वार्षिक वर्गणी
२५ रुपये

अंकाचे मूल्य
७ रुपये

अनुक्रमणिका

कोल्हापूर क्षेत्रस्थ ब्राह्मण व आचार्यपीठस्थ जगद्गुरु यांचे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त यासंबंधीचे अधिकार	१
" मध्य तापी खोऱ्यातील आद्य शेतकरी व त्यांची वसाहत रचना "	७
Agrarian Conditions in Maharashtra, 1740–1790	१७
दुर्ग जिंजी	३२
चतुर्वर्गचिंतामणि	३५
एक अप्रकाशित कागद–पंचांचे अधिकार	४०
मंडळ वृत्तान्त–पुरंदरे दप्तर	४५

●

प्रकाशक : डॉ. प्र. न. देशपांडे, मुख्य चिटणीस,
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
मुद्रक : चिं. स. लाटकर,
कल्पना मुद्रणालय, ' शिव-पार्वती ', पुणे

कै. भा. वा. ऊर्फ तात्यासाहेब भट यांचा एक अप्रकाशित लेख

"विश्वनाथो विजयते"

कोल्हापूर क्षेत्रस्थ ब्राह्मण व आचार्यपीठस्थ जगद्‌गुरु यांचे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त यासंबंधीचे अधिकार

प्रस्तुतच्या विषयासंबंधी असलेले श्रीछत्रपति शाहूचे एक आज्ञापत्र राजवाडे संशोधन मंदिरातील संग्रहात आढळले. आज्ञापत्र ज्या कागदावर लिहिले आहे तो कागद इंग्रज-पूर्वकालीन विदेशी असावा असे वाटते. त्यावरील वाटरमार्क्स व अक्षरे यावरून तो कागद पोर्तुगाल देशातील असावा. कागद आदमासे ४।। फूट लांब व ६ इंच रुंद आहे. आज्ञापत्र बालबोध लिपीत लिहिलेले असोन सुवाच्य आहे. आज्ञापत्रावर 'राज्याभिषेक शक ५० शोभकृतनाम संवत्सरे कार्तिक बहुल सप्तमी भृगुवासरे' असा उल्लेख आहे. यावरून हे आज्ञापत्र शके १६४५ इंग्रजी सन १७२३ ता. ८ नोहेंबरचे असावे; म्हणजे जवळ जवळ २००/२२५ वर्षांपूर्वीचे हे आज्ञापत्र आहे. आज्ञापत्र अस्सल नसोन नक्कल आहे. लेखावर मराठी मुद्रा आहेत.

येणेप्रमाणे आज्ञापत्राचे बहिरंगाचे वर्णन झाले. आता त्या आज्ञापत्रात काय लिहिलेले आहे व आज्ञापत्र लिहिण्यास काय कारणे घडली याचा आपण विचार करू.

श्री छत्रपति शाहू महाराज पन्हाळे मुक्कामी असता त्यांच्याकडे करवीर क्षेत्रस्थ ब्राह्मण तक्रार घेऊन गेले व महाराजांस आपला अर्ज सादर करून विनंती केली की अलीकडे आम्हा क्षेत्रस्थ ब्राह्मणांमधे व मठीच्या पीठस्थ आचार्यांमधे कलह होऊ लागला आहे. पीठस्थ स्वामींनी आम्हास बोलावून म्हटले की हव्यकव्यामधे मठीचा ब्राह्मण नियत सांगावा हे तुम्ही मान्य करा. तेव्हा आम्ही त्यांस सांगितले की 'हे पूर्वीपासोन चालत आले नाही व नवीन केलीया होत नाही,' यावर स्वामी रागावले व तुकणभट यास मार दिला व नवीन कायदा मान्य करा म्हणून अतिशय आग्रह करू लागले. अशा परिस्थितीत आम्हास राहता येत नाही. तेव्हा क्षेत्र सोडून जाण्यास महाराजांनी परवानगी द्यावी. महाराजांनी मनात विचार केला की क्षेत्र फार जुने आहे

व ब्राह्मण क्षेत्र सोडून गेल्यास त्याचे महत्त्व कमी होईल. असा विचार करून महाराजांनी राजेश्री पंडितरावास आज्ञा केली की तुम्ही या बाबतीत तपास करून स्वामींना पत्र लिहा. नंतर पंडितरावांनी स्वामीस पत्र लिहिले की 'क्षेत्रामध्ये मठीचा ब्राह्मण नियत सांगणे व दक्षिणा देणे हे पूर्वी चालले नाही. जे सांगितले ते सांगोत व सांगेत ना ते न सांगोत हे गोष्टीचा आग्रह स्वामींनी करू नये. आचार व्यवहार व प्रायश्चित जे क्षेत्रास येईल ते क्षेत्री होईल व मठास येईल ते मठी होईल' श्री स्वामींना हे पत्र आल्यानंतर त्यांनी श्री. व्यंकटाचार्ये रायाचे मुतालिक व वेंकाजी राघव हिमत पंत प्रधान यांस बोलावून व वेदमूर्ती भटजी देऊकाशीकर व रामभट आराध्ये व जोशी वडणगेवर याच्या समक्ष सांगितले की राजांचे पत्र आम्हास कबूल आहे. त्याप्रमाणे स्वामींनी महाराजांकडे निरोप पाठविला की आम्ही राजांचे बाहेर नाही. मग महाराजांनी ब्राह्मणांचे समाधान करून त्यास करवीरास परत पाठविले व त्याबरोबर आज्ञापत्र दिले. "श्री स्वामी आपणहून मठीचा ब्राह्मण पाठविणार नाहीत. स्वसंतोषे जे सांगणार ते सांगतील व आचार व्यवहार प्रायश्चित ते क्षेत्रास येईल ते क्षेत्री निवडेल. मठास येईल ते मठी निवडेल...पूर्वी श्रीमत् समाधिस्थ स्वामीनी करवीर क्षेत्री मठ बांधिला. त्यांनी क्षेत्री नूतन प्रसंग काही केला नाही त्याचप्रमाणे स्वामीनी नूतन प्रसंग न करिता..."

याप्रमाणे ही आज्ञापत्राची हकीकत आहे. रा. भट यांनी भारत इतिहास संशोधनाच्या डिसेंबर १९३२ च्या त्रैमासिकात जो लेख लिहिला आहे व त्यांनी जी अनुमाने काढली आहेत त्या अनुमानास पुष्टी देणारे हे आज्ञापत्र आहे.

आता आपणास एक गोष्ट प्रामुख्याने दिसते ती ही की क्षेत्रस्थ ब्राह्मण व पीठस्थ आचार्य यांच्यामध्ये आचार व्यवहार व प्रायश्चित्त यासंबंधाने वाद उपस्थित झाला असावा. अर्थातच या पूर्वी आचार व्यवहार व प्रायश्चित्त वगैरे बाबतीत पीठस्थ स्वामीचे अधिकार नव्हते. पीठस्थ स्वामी जेव्हा नवीन कायदा सांगू लागले त्याच वेळेस क्षेत्रस्थ ब्राह्मणांनी आपले हक्क महाराजांकडून प्रस्थापित करून घेतले. हल्ली ज्याप्रमाणे दोन्ही शंकराचार्यांमध्ये वाद उत्पन्न झाला व आपले हक्क प्रस्थापित करण्याकरता प्रिव्ही काउन्सिलपर्यंत गेले. त्याचप्रमाणे त्या काली क्षेत्रस्थ ब्राह्मणांनी आपले हक्क पीठस्थ आचार्य बळकावू पाहतात असे जेव्हा त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी श्री छत्रपती शाहू महाराजाकडे, अर्थातच त्या वेळचे 'प्रिव्ही कौन्सिल' आपल्या तक्रारी मांडून आपले हक्क शाबूत ठेवले.

आचार व्यवहार व प्रायश्चित्त या बाबतीत पूर्वी कोणाकडे काय अधिकार होते हे आता आपण पाहू.

मनुस्मृतीत याबद्दल १२ व्या अध्यायात पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे. "पुढे सांगितलेल्या लक्षणांनी युक्त असलेले शिष्ट ब्राह्मण जो धर्म सांगतील तो निश्चित आहे असे समजावे. ब्रह्मचर्यादी पूर्वोक्त धर्माचे अनुष्ठान करून ज्यांनी षडंगे मीमांसा

धर्मशास्त्र व पुराणे यांनी परिपूर्ण होणारा वेद समजावून घेतला आहे ते तेच शिष्ट समजावे. पुष्कळ न मिळाल्यास कमीत कमी दहा किंवा सदाचारसंपन्न असे निदान तीन ब्राह्मण जेथे असतात तीच सभा होय. अशी सभा जो धर्म निश्चित करील तो धर्मच होय असे निश्चयाने समजावे." याप्रमाणे मनुस्मृतीत उल्लेख आहे. याज्ञवल्क्य स्मृतीतही असाच उल्लेख आहे. यावरून शिष्ट ब्राह्मणांच्या परिषदेस कोणतेही कर्म धर्मास अनुसरून आहे किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार होता.

आता हे अधिकार शंकराचार्यांकडे तरी कोणत्याही कालापासून आले याचा विचार करू. शृंगेरी मठाची स्थापना आद्य शंकराचार्यांचेच काळी झाली असे मानण्यास सबल पुरावा आहे व याबद्दल रा. बोडसांनी आपल्या ग्रंथात उल्लेख केला आहे. या मठाची स्थापना होऊन आज जवळ जवळ १००० वर्षे झाली व येवढ्या काळात जर वरील पीठाकडून आचार, व्यवहार प्रायश्चित्त बाबतीत अधिकार गाजवले गेले असतील तर त्याबद्दल कुठे तरी उल्लेख असता परंतु असा पुरावा अजून उपलब्ध नाही. उलट क्षेत्रस्थ ब्राह्मणाकडे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त वगैरे बाबतीत अधिकार होते अशा-बद्दलचा पुरावा आढळतो हे आपणास पुढील गोष्टीवरून दिसून येईल.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध संत श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या उपनयनाच्या बाबतीत वाद उत्पन्न झाला. स्मृतिधर्मास अनुसरून श्रीज्ञानेश्वरांचा उपनयनविधी करता येतो की नाही या प्रश्नाचा निर्णय करण्याचे काम पैठण येथील ब्रह्मवृंदाकडे सोपवले होते. पीठस्थ आचार्यांकडे नव्हते हे आपणा सर्वांस माहीत आहे. या कालात महाराष्ट्रात यादव घराण्याची सत्ता होती.

यादवांची सत्ता नष्ट झाल्यावर मुसलमानांची सत्ता प्रस्थापित झाली. या काळातील अनेक लेख उपलब्ध आहेत त्यांचा विचार केला असता आपणास असे दिसोन येईल की आचार, व्यवहार व प्रायश्चित्त या बाबतीतले सर्व अधिकार क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदाकडेच होते, व हे दर्शविणारा एक महत्त्वाचा लेख मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड २१ मध्ये नंबर २०९ हा आहे.

शिवाजी महाराजांच्या वेळी देखील पीठस्थ आचार्यांना वरील बाबतीत अधिकार नव्हते. त्यांच्या अष्ट प्रधानात पंडितराव या नावाचा एक प्रधान असोन त्याजकडे पुढीलप्रमाणे अधिकार होते. "पंडितराव यांनी सर्व धर्माधिकार धर्म, अधर्म पाहून विविक्षा करावी, शिष्टांचे सत्कार करावे, आचार व्यवहार प्रायश्चित्त पत्र होतील त्याजवर समत चिन्ह करावे..." (इतिहास आणि ऐतिहासिक विविध विषय पान २१) या उल्लेखावरून पीठस्थ आचार्यांना वरील बाबतीत अधिकार दिले नव्हते. पीठस्थ आचार्यांकडे जर अधिकार असते तर शिवाजीमहाराजांनी ते अधिकार कधीही काढून घेतले नसते. महाराजांनी पूर्वपरंपरा कायम ठेवली.

प्रस्तुतचे आज्ञापत्र इ. स. १७२३ मधले आहे. यावरून पेशवाईच्या आरंभी सुद्धा

पीठस्थ आचार्यांकडे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त वगैरे बाबतीत अधिकार नव्हते. परंतु पीठस्थ आचार्य आपले वर्चस्व प्रस्थापित करू पाहात होते. पण क्षेत्रस्थ ब्राह्मण वेळीच सावध होऊन त्यांनी श्री. छत्रपती शाहू महाराजांकडून आपले हक्क कायम करून घेतले.

पिष्ट पशु करावा किंवा नाही या संबंधाचा निर्णय निरनिराळ्या क्षेत्राच्या जमलेल्या ब्राह्मणांनी केलेला. हा निर्णय बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील आहे. यावरून या कालापर्यंत तरी क्षेत्रस्थ ब्राह्मण आपला हक्क गाजवीत होते.

तोतया सदाशिवराव भाऊंचे बंड मोडल्यानंतर प्रायश्चित्तासंबधाने वाद उत्पन्न झाला. तोतया खरा समजोन पुष्कळ ब्राह्मणांनी त्याच्याबरोबर मेजवान्या झोडल्या; पण खरे प्रकरण जेव्हा बाहेर आले तेव्हा मग त्या जेवलेल्या ब्राह्मणांच्या प्रायश्चित्ता-संबंधी प्रश्न उपस्थित झाला. हा प्रश्न क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदांनीच सोडवला. पीठस्थ आचार्यां-कडे जर वरील बाबतीत अधिकार असते तर साहजिकच त्यांच्याकडे प्रश्न सोपवल असता.

मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड २, मधे २३० लेखांक आहे. त्या लेखातही असे आढळून येते की पीठस्थ आचार्यांकडे आचार, व्यवहार व प्रायश्चित्त बाबतीत अधिकार नव्हते. हा काल इ. स. १८५६चा आहे.

आता पीठस्थ शंकराचार्यांनी आचार, व्यवहार व प्रायश्चित्त बाबतीत आपला अधिकार गाजवला असे ठळक उदाहरण आपणा सर्वांस माहीत आहे. ते म्हणजे लो. टिळकांचे पंच हौद मिशन प्रकरण.

पीठस्थ आचार्यांनी वरील बाबतीत आपले अधिकार केव्हापासून गाजवण्यास सुरुवात केली हे काही अद्याप निश्चित सांगता येत नाही. परंतु साधारणपणे त्यांनी महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरू होण्याचे वेळेपासून आपले वर्चस्व गाजविण्यास सुरुवात केली असावी.

हल्ली आपली जी एक कल्पना आहे की पीठस्थ शंकराचार्यांकडेच पहिल्यापासून आचार, व्यवहार व प्रायश्चित्त वगैरेबाबतीत अधिकार होते ती कल्पना कशी चुकीची आहे हे आपणास दिसोन येईल. मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणे शिष्टलोकांच्या परिषदेस हे अधिकार होते व ते आपला अधिकार वेळच्या वेळी बजावीत असत. हे आपणास वरील विवेचनावरून दिसोन येईल.

%

नकल

राज्याभिषेक शके ५० मधील शंकराचार्यांचे मठाचे पत्र

श्री महालक्ष्मी तालिक

श्री शंकर भारती श्री नरसिंह भारती स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५० शोभकृत नाम संवत्सरे कार्तिक बहुळ सप्तमी भृगुवासरे क्षेत्रीय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी याणी राजेश्री देशधिकारी व कार्कुन वर्तमान व भावी सुभाप्रांत कोल्हापुर यासी आज्ञा केली ऐसी जे समस्त ब्राह्मण क्षेत्र करवीर यांनी किले पनाळियाचे मोकामी येवुन विदित केले की श्री स्वामीनी करवीरक्षेत्री मठ बांधिला—क्षेत्री हव्यकव्य होताहेत तेथे मठीचा ब्राह्मण नियत सांगावा दक्षणा द्यावी म्हणून कायिद्याचा प्रसंग आरंभिला. त्यामुळे आम्हामध्ये व मठीचा ब्राह्मणामध्ये कलह होवु लागला. श्रीस्वामींनी आम्हास बोलाऊन म्हटले की हव्यकव्यामध्ये मठीचा ब्राह्मण नियत सांगावा दक्षिणा द्यावी हे मान्य करा म्हणून स्वामित्ये बोलिले त्यास अम्ही विज्ञप्ति केली की हे पूर्वीपासून चालिले नाही. नूतन केलिया होत नाही ऐसे बोलिलो त्यावरून श्रीस्वामींनी कोपातिशय करून तुकणभट्ट अध्यापक यांस मार केला ऐशीयास नवा कायिदा मान्य करा म्हणून ऐसा अतिशय करू लागले व गंगाधर पुजारी व सखो गोविंद हे मठीचे कार्यभागी जाहले आहेत. नाना प्रकारे कुचोद्ये सांगून श्री स्वामीचा मनात विक्षेप उत्पन्न करितात त्यामुळे नस्ते कथले होतात येखादे विलयास जाईल. यास्तव आमच्याने क्षेत्री राहवत नाही. महाराजाची आज्ञा घेवुन स्थलांतरास जातो म्हणवून विदित केले त्यावरून मनास आणिता श्रीकरवीरक्षेत्र अनादि पुराणप्रसिद्ध दक्षिण वाराणसी येथे ब्राह्मण वंशपरंपरेने वास करून राहिले आहेत हे क्षेत्र टाकूनि गेलिया क्षेत्राचा महिमा राहात नाही व श्रेयस्कर नव्हे हा अर्थ मनास आणून श्रीस्वामीचा व ब्राह्मणाचा कलह नीवारण करावा येविषयी राजेश्री पंडितराव यासि अज्ञा केली यावरून त्यांनी श्रीस्वामीस पत्र लिहिले की क्षेत्रामध्ये हव्यकव्यी मठीचा ब्राह्मण नियत सांगणे व दक्षणा देणे हे पूर्वी चालिले नाही जे सांगतील ते सांगोत व सांगेतना ते ना सांगोत हे गोष्टीचा आग्रह स्वामींनी करू नये व आचार व्यवहार प्रायश्चित्त जे क्षेत्रास येयील ते क्षेत्री होईल व मठास येयील ते मठी होईल व गंगाधर पुजारी व सखो गोविंद या दोघांस मठिचा कार्यभाग सांगितल्याने नसते कथिले होताहेत यास्तव गंगाधर पुजारी यास मठिचा कार्यभाग न सांगावा व सखो गोविंद यास मठी आपणा सन्नीध्य कार्यभाग न सांगावा दुसरे कार्य सांगावे व महाराज राजेश्रींनी वेदशास्त्रसंपन्न राजेश्री नरहरीभट्ट सांवगावकर यास श्री-देवीचे पूजापुरस्कार उत्साह चालवायाचे स्वाधीन केले आहे त्याप्रमाणे कार्यभाग चालवावा त्याचे साहित्य स्वामींनी करावे विक्षेप होवू नये म्हणून पत्र लिहिले त्यावरून श्रीस्वामींनी

राजेश्री व्यंकटाचार्ये पंडीतरायाचे मुतालीक व वेंकाजी राघव दीमत पंतप्रधान यास बोलावून वेदमूर्ति भटजी देऊकाशीकर व रांभट्ट आराध्ये व नारायण जोसी वडणगेकर याचे साक्षीनी बोलिले की क्षेत्रात हव्यकव्यी मठिचा ब्राह्मण जो सांगल तो सांगोन सांगलतो न सांगो बलात्कारे मठीचा ब्राह्मण पाठवणार नाही आचार व्यवहार प्रायश्चित्त क्षेत्रास येथील ते क्षेत्री नीवडावे मठास येथील ते मठी नीवडावे गंगाधर पुजारी यास मठीचा कार्यभाग सांगत नाही व सखो गोविंद यास मठी आपणा सन्नीध कार्यभाग सांगत नाही व राजेश्री नरहरीभट्ट सांवगांवकर श्री. चे पूजापुरस्कार महोत्साह करितील त्यास आपणाकडून विक्षेप होवू देणार नाही येणे प्रमाणे आपले श्रीगुरुचरण शफत असे शफतपूर्वक श्रीस्वामीनी मान्य करून राजेश्री पंडितराव यासि व पंतप्रधान यासी पत्रे लिहिली की राजेश्रीचा उव आपल्या विचारास येईल त्याप्रमाणे ब्राह्मणाचे समाधान करून पाठवावे राजेश्री व आपले व्यतिरिक्त अपण आहो ऐसे नाही म्हणून स्वामीनी पत्रे लिहीली व वेंकटाचार्ये व नारायण जोसी वडणगेकर या जवल मुखवचन ही सांगोन पाठविले त्या वरून निश्चय करून करवीरचे ब्राह्मणाचे समाधान केले. आणि ब्राह्मणास क्षेत्रास पाठविले आहेत क्षेत्रामध्ये हव्यकव्यी श्रीस्वामि आपण होवुन मठिचा ब्राह्मण पाठविणार नाहीत स्वसंतोषे जे सांगणार ते सांगतील व आचार व्यवहार प्रायश्चित्त जे क्षेत्रास येईल ते क्षेत्री नीवडेल मठास येईल ते मठी नीवडेल व गंगाधर पुजारी यास मठीचा कार्यभाग करायास समंध नाही व सखो गोविंद यास श्रीस्वामीनी आपणा सन्नीत्ध कार्यभाग न सांगावा. स्छधांतरी सांगावा ऐसा निर्वाह केला आहे या करिता क्षेत्रीचे ब्राह्मणांनी आपले समाधान रक्षून स्नानसंध्या अग्निहोत्रादी सत्कर्म आचरोन राज्यास कल्याण चिंतून सुखरूप असावे पूर्वी श्रीमत् समाधिस्छ स्वामीनी करवीर क्षेत्री मठ बांधिला त्यांनी क्षेत्री नूतन प्रसंग काही केला नाही त्याचप्रमाणे श्रीस्वामीनी नूतन प्रसंग न करिता प्रवर्त्त, करावावया जाहलियां निर्वाहात क्षेत्रीचे ब्राह्मणामध्ये अथवा आणखी कोण्ही कुचोद्य करितील त्याची क्षमा होणार नाही तुम्ही ह्या निर्वाहाप्रमाणे उभयपक्षी चालवणे याची तालीक घेवुन असल करवीरिचे ब्राह्मणाजवळ परतोन देणे.

%

" मध्य तापीखोऱ्यातील आद्य शेतकरी व त्यांची वसाहत रचना "

डॉ. वसंत शिंदे

मध्य तापीच्या प्रदेशात सध्याचा धुळे जिल्हा व गुजरातमधील सुरतच्या काही भागाचा समावेश होतो. गुजरातमधील सुरत जिल्ह्याचा काही भाग हा १९६० पूर्वी पश्चिम खानदेशमध्येच मोडत असे. धुळे जिल्हा हा महाराष्ट्रातील मोठ्या जिल्ह्यांपैकी एक असून महाराष्ट्राच्या उत्तरेच्या टोकाला वसलेला आहे. जिल्ह्याच्या विशिष्ट अशा भौगोलिक रचनेमुळे इतिहासपूर्व काळापासून या भागाला अनन्यसाधारण असे महत्त्व आले परंतु पुरातन संशोधनाच्या संदर्भात मात्र या भागाकडे पूर्ण दुर्लक्ष केले गेले होते. डॉ. साळी, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे पुरातत्त्वज्ञ यांनी १९६० ते ७० च्या दरम्यान या भागात सर्वेक्षण केले.[१] त्यांनी पायी फिरून या भागात जवळ जवळ पाऊणशेच्या आसपास ताम्रपाषाणयुगीन व इतिहास कालीन वसाहती उजेडात आणल्या, परंतु त्या पुढील संशोधनाला मात्र पूर्ण खीळ बसली व हा भाग अगदीच दुर्लक्षिला गेला.

धुळ्याच्या उत्तरेला सीमेवरती मध्य प्रदेश पश्चिमेला गुजरात तर दक्षिणेला गोदावरीचे खोरे आहे. तापीच्या खोऱ्याची भारतातील अतिशय सुपीक अशा भागापैकी एक अशी गणना केली जाते. बराचसा भाग हा गाळाच्या सुपीक तसेच काळ्या मातीने व्यापलेला आहे. ह्या भागात पाऊस जरी अनिश्चित व कमी पडत असला (५०० ते ७०० मि. मी.) तरी तापी व तिच्या बऱ्याचशा उपनद्या ह्या बारमाही वाहणाऱ्या आहेत. बारमाही वाहणाऱ्या नद्यांमध्ये तापी व तिच्या प्रमुख उपनद्या नेसु, पांजरा, कान, बुराई, अमरावती, अरुणावती व गोमई यांचा समावेश होतो.

भोगोलिक दृष्टया धुळयात तीन असे वेगळे ठळक पट्टे आढळतात.[२]

(१) उत्तरेकडील ३० ते ४० कि. मी. प्रदेश सातपुडा पर्वताने व्यापलेला असून हा प्रदेश खडकाळ व मुरमाडयुक्त मातीने व्यापला गेलेला आहे.

(२) मध्य भाग तापी व त्याचा परिसर गडद काळ्या व गाळाच्या मातीने व्यापलेला असून हा भाग संपूर्ण तापीतील अतिशय सुपीक असा आहे.

(३) दक्षिणेकडील भाग हा तापीच्या उपनद्यांनी व्यापलेला असून सखल व नद्यांना बारमाही पाणी असलेला असा आहे; तसेच सुपीक मध्य काळ्या मातीने व्यापलेला आहे.

या भागात तीन ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या वसाहतीच्या ठिकाणी प्रकाशे[३], सावळदा व बहुरूपा[४] उत्खनने झाली आहेत. परंतु तेथे कोणकोणत्या संस्कृतीच्या लोकांनी वातव्य केले हे जाणून घेण्यापलीकडे त्यांचा उद्देश नव्हता.


ताम्रपाषाणयुगीन संस्कृती

केवळ योगायोग म्हणूनच १९५० मध्ये जोर्वे (जि. अहमदनगर, महाराष्ट्र) येथे जोर्वे संस्कृतीची पहिली ताम्रपाषाणयुगीन वसाहत उजेडात आली व तेव्हापासून महाराष्ट्रभर जोमाने संशोधनाला सुरुवात झाली. कोकण किनारपट्टी व विदर्भाचा काही भाग सोडल्यास महाराष्ट्रात सर्वत्र ताम्रपाषाणयुगीन लोकांनी वस्ती केली होती. या संशोधनामुळे महाराष्ट्रात जवळ जवळ २०० च्या आसपास ताम्रपाषाणयुगीन वसाहती शोधून काढण्यात यश आले आहे. काही ठरावीक महत्त्वाच्या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या स्थलांची विस्तृत प्रमाणात नवीन पद्धतीने उत्खनने करण्यात आली. त्यामध्ये इनामगाव[५] (ता. शिरूर, जि पुणे) व काही प्रमाणात दायमाबाद[६] (ता. श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर) येथील उत्खननांनी त्या काळातील लोकांच्या जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक व इतर अनेक पैलूंवर चांगलाच प्रकाश टाकला गेला आहे. व केवळ त्यामुळेच सिंधू संस्कृतीपासून ते थेट लोहयुगापर्यंतचा संपूर्ण इतिहास लिहिण्यास संशोधकांना चांगलीच मदत झाली आहे.

एकंदरीत ताम्रपाषाणयुगीन वसाहतींची व्याप्ती पाहता सर्वात अधिक म्हणजे २०० पैकी १०० च्या वर वसाहती एकट्या तापीच्या खोऱ्यात विखुरल्या आहेत, त्या-खालोखाल गोदावरीच्या खोऱ्यात व सर्वांत कमी भीमेच्या खोऱ्यात झाल्या. अशा प्रकारे वितरणात फरक होण्याचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक खोऱ्यात शेतीसाठी उपयुक्त सुपीक जमिनीचे कमी जास्त प्रमाण व पाणी पुरवठा. प्रत्येक खोऱ्यात म्हणजे गोदावरीत दायमाबाद, भीमेत इनामगाव तर तापीत प्रकाशे ही तात्कालीन मोगली शहरे होती. ही शहरे आजूबाजूच्या खेड्यातील आर्थिक व सामाजिक वगैरे बाबीवरती नियंत्रण ठेवणारी होती. उदा. चांदोली येथील लोकांना इनामगाव येथून होणाऱ्या मातीच्या भांड्यांच्या पुरवठ्यावरती सर्वस्वी अवलंबून राहावे लागत होते.[७]

तापीच्या खोऱ्यात आद्य शेतकऱ्यांच्या घनदाट वसाहती होण्याची तीन प्रमुख कारणे आहेत.

(१) तापीच्या खोऱ्यात काळी व मळीची सुपीक जमीन विपुल आहे. ही जमीन




' संशोधक ' कॉंग्रेसशताब्दी अंक (१९८५) प्रकाशन

मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य व राजवाडे बँकेचे चेअरमन श्री. कां. भि. चौधरी अंकाचे उद्‌घाटक श्री. रोहिदास दाजी पाटील, राज्यमंत्री, महाराष्ट्र यांचे स्वागत करताना. पाठीमागे मंडळाचे चिटणीस श्री. अतुल जोशी, अध्यक्षस्थानी ' आपला महाराष्ट्र 'चे संपादक भाई मदाने.



' संशोधक ' मार्च–जून १९८६ प्रकाशन


मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. बाळासाहेब मुंदडे अंकाचे उद्‌घाटक श्री. अरविंद इनामदार, डी. आय. जी. यांचे स्वागत करताना




मध्यतापी खोऱ्यातील आद्य शेतकऱ्यांची वसाहत रचना



चिंचखेडे येथील मातीची भांडी (जोर्वे संस्कृती)



चिंचखेडे येथील मातीची भांडी (जोर्वे संस्कृती)



चिंचखेडे येथील तांब्याचा भाला (जोर्वे संस्कृती)



चिंचखेडे येथील मातीची भांडी (जोर्वे संस्कृती)

भुसभुशीत व जास्त मशागत न करता सुद्धा भरपूर पीक देणारी अशी आहे. दंव किंवा पाणी शोषून घेऊन, जास्त काळ साठवून ठेवण्याच्या गुणधर्मामुळे, भरपूर व सतत पाऊस पडला नाहीं तरी पिकांना फारसा धोका पोहचत नाही.

(२) तापी व तिच्या बऱ्याचशा उपनद्या ह्या बारमास वाहणाऱ्या असल्यामुळे पाण्याचा अजिबात तुडवडा पडत नाही.

(३) तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे तापीच्या खोऱ्याची महत्त्वपूर्ण अशी भौगोलिक रचना. पश्चिमेच्या किंवा उत्तरेच्या लोकांना दक्षिणेकडे किंवा दक्षिणेच्या लोकांना उत्तरेकडे प्रयाण करायचे असेल तर त्यांना तापीच्या खोऱ्यातून जाण्याशिवाय गत्यंतर नाही. म्हणूनच गुजरातमधील उत्तर सिंधू संस्कृतीच्या लोकांच्या व माळव्यातील माळवा संस्कृतीच्या लोकांच्या माळव्यात जाण्यापूर्वी तापीत फार मोठ्या प्रमाणात वसाहती झाल्या.

तापीत चार ताम्रपाषाणयुगीन संस्कृती होऊन गेल्या.

(१) सावळदा संस्कृती (इ. स. पूर्व २००० ते १८००)

(२) उत्तर सिंधू संस्कृती (इ. स. पूर्व १८०० ते १६००)

(३) माळवा संस्कृती (इ. स. पूर्व १६०० ते १४००)

(४) जोर्वे संस्कृती (इ. स. पूर्व १४०० ते १०००)

प्रत्येक संस्कृतीच्या मातीच्या भांड्यांची जडणघडण, त्यावरील नक्षीकाम, आकार भाजण्याची पद्धत वेगळी होती. आणि केवळ या भांड्यांच्या वेगळेपणामुळेच एकव संस्कृती दुसऱ्या संस्कृतीपासून वेगळी (किंवा निराळी) ओळखता येते.

महाराष्ट्रातील सर्वांत आद्य शेतकरी हे तापीमध्येच उदयास आले. या संस्कृतीची पहिली ओळख डॉ. साळी, या भारतीय पुरातन सर्वेक्षण विभागाच्या पुरातत्त्वज्ञाने करून दिली.[८] या संस्कृतीचा प्रथम शोध तापीमधील नंदुरबारपासून २० कि. मी. अंतरावर असलेल्या सावळदा या गावी लागला व म्हणूनच गावाच्या नावावरून या संस्कृतीला " सावळदा संस्कृती " असे संबोधण्यात येऊ लागले. सावळदा ठिकाण तापी नदीच्या डाव्या किनाऱ्यावरती असून त्याने जवळ जवळ दीड हेक्टर एवढी जागा व्यापली आहे. आतापर्यंत आढळून आलेल्या या संस्कृतीच्या एक दोन वसाहती सोडल्यास सर्व वसाहती तापीतच आहेत. त्यामुळे या संस्कृतीचा उदय तापीत झाला असे म्हणण्यास हरकत नाही. धुळ्याला लागून असलेल्या मध्य प्रदेशात अद्यापि या संस्कृतीची एकही वसाहत सापडलेली नाही. तापीत या संस्कृतीच्या आतापर्यंत २७ वसाहती उजेडात आल्या आहेत.

त्यानंतर हळूहळू उत्तर सिंधू संस्कृतीच्या लोकांचे तापीत स्थलांतर होण्यास सुरुवात झाली. नर्मदा नदीत असणाऱ्या खोल व भीतिदायक अशा दऱ्यांमुळे त्यांना तापीपेक्षाही सुपीक भागात स्थलांतर करण्यात यश आले नाही व त्यामुळेच त्यांना खाली दक्षिणेकडे

तापीत उतरणे भाग पडले. त्यांच्या स्थलांतराचा मार्ग आता जवळजवळ निश्चित करण्यात यश आले आहे. हे लोक प्रा. ढवळीकर यांनी विधान केल्याप्रमाणे गुजरातमधील भगतराव या गावाहून थेट तापीच्या किनाऱ्याने न येता सोनगडमधून नवापूरमध्ये उतरले.[९] अशा प्रकारे प्रथम या लोकांनी तापीच्या उपनद्यांच्या खोऱ्यात वसाहती केल्या. नवापूरमध्ये असलेल्या नेसू नदीत वस्ती केल्यानंतर ते हळूहळू कान नदीत उतरले व तेथून संपूर्ण धुळे जिल्ह्यात पसरले. आतापर्यंत त्यांच्या २३ वसाहती तापीमध्ये शोधण्यात आल्या आहेत.[१०]

माळवा संस्कृती ही माळव्यातच विकसित झाली. त्यांची फार मोठ्या प्रमाणात भरभराट झाली. त्यांच्या मोठमोठाल्या वसाहती उदयास आल्या. नावडातोळी (जिल्हा निमाड, मध्यप्रदेश) येथे उत्खननातून मिळालेल्या पुराव्यामुळे या वसाहतींची भरभराट उजेडात आली.[११] जेव्हा लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली व शेतीयुक्त सुपीक जमीन कमी पडू लागली त्या वेळी त्यांना चांगल्या सुपीक जमिनीच्या शोधाप्रीत्यर्थ दुसरीकडे प्रयत्न करण्याची आवश्यकता भासली. उत्तरेकडच्या विंध्य पर्वताच्या रांगांनी त्याच्या उत्तरेकडच्या प्रयाणाला खीळ बसली तर नर्मदेमधील खोल अशा दऱ्यांमुळे त्यांचे पश्चिमेकडील प्रयाण रोखले गेले. त्यामुळे खाली दक्षिणेकडे तापीमध्ये स्थलांतर करण्याचा एकच मार्ग त्यांना उरला होता. हे लोक बऱ्हाणपूरमार्गे सरळ खाली बहाल (जिल्हा जळगाव) येथे आले असणार. आजसुद्धा दळणवळणासाठी हाच मार्ग सुलभ पडतो. बहालमध्ये मोठ्या प्रमाणात वस्ती केल्यावर मग ते हळूहळू तापीत पसरले व नंतर प्रकाशे (ता. शहादा) पर्यंत येऊन धडकले असण्याची दाट शक्यता वाटते.

गोदावरीच्या खोऱ्यात असलेली बेताचीच सुपीक जमीन ऐन भरभराटीस आलेल्या जोर्वे संस्कृतीच्या लोकांना अपुरी पडू लागली. म्हणूनच काही लोकांना भीमेच्या खोऱ्यात तर काहींनी तापीच्या खोऱ्यात स्थलांतर करण्यास सुरुवात केली. तापीच्या खोऱ्यात पदार्पण करण्यासाठी दुर्गम अशा सह्याद्रीत बोरगाव घाटातून सुलभ मार्ग आहे. हा घाट जोर्वे लोक चढून आले व लगेच पिंपळदर (ता. सटाणा, जि. नासिक) या ठिकाणी त्यांनी वस्ती केली. तेथून सरकत सरकत ते पांजरा नदीच्या खोऱ्यात आले व तेथे मोठ्या प्रमाणात त्यांनी वसाहती केल्या. मुबलक प्रमाणात सुपीक जमीन व भरपूर पाणीपुरवठा त्यामुळे त्यांची परिस्थिती चांगलीच सुधारली. त्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे चिंचखेडे (ता. साक्री) येथे मोठ्या प्रमाणात झालेली समृद्ध वस्ती. या जमिनीचे मालक उसाच्या लागवडीसाठी ही जागा नांगरत असताना डझनभर जोर्वे संस्कृतीची भांडी (चित्र १) व एक तांब्याचा फाळही मिळाला (चित्र २) तसेच अजूनही जमिनीवरती खापराचे खच पडलेले दिसतात.

वसाहत रचना (Settlement Pattern)

वसाहत रचना ही भूगोलातील संकल्पना पुरातत्त्वशास्त्रात उपयोगात आणण्याचे श्रेय प्रख्यात अमेरिकन पुरातत्त्वज्ञ प्रा. गॉर्डन विली यांना जाते. त्यांनी १९५३ मध्ये पेरूमधील विरू नदीच्या खोऱ्यातील प्राचीन संस्कृतीचा या पद्धतीने अभ्यास केला,[१२] व या प्रकारच्या वसाहत रचनेचा अभ्यास किती महत्त्वपूर्ण आहे हे सर्वप्रथम दाखवून दिले. तेव्हापासून बऱ्याचशा पुरातत्त्वज्ञांचे लक्ष वसाहत रचनेच्या अभ्यासाकडे वळले आहे. अगदी साध्या शब्दांत वसाहत रचना याचा अर्थ सांगायचा झाला तर एखाद्या स्थळी प्राचीन काळी मानवी वसाहत का झाली किंवा एखादा प्रदेश विशिष्ट संस्कृतीच्या लोकांनी वस्तीसाठी का निवडला हे पाहणे.

प्राचीन मानवाने एखाद्या स्थळाची निवड करताना प्रामुख्याने खालील गोष्टींचा विचार केला.

(१) पाण्याचा पुरवठा
(२) शेतीसाठी उपलब्ध होऊ शकणारी जमीन
(३) आसपासच्या परिसरातील भू-रचना
(४) गुरांसाठी कुरण
(५) इमारती लाकडाचा पुरवठा व जंगल संपत्ती
(६) हत्यारे व भांडी बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल वगैरे.

मध्य तापीच्या खोऱ्यात आतापर्यंत एकंदर १०३ ताम्रपाषाणयुगीन वसाहती शोधून काढण्यात यश आलेले आहे. (नकाशा १) त्याची एकंदर व्याप्ती पाहिल्यानंतर एका विशेष गोष्टीचा उल्लेख करणे फार जरुरीचे वाटते. तापी नदीच्या आसपासचा प्रदेश अतिशय सुपीक असा असला तरी तिच्या किनाऱ्यावरती फारच तुरळक प्रमाणात वसाहती आढळून येतात. एकंदर १०३ ज्ञात वसाहतींपैकी फक्त २५ च्या आसपास वसाहती तापीवरती वसलेल्या आहेत व बाकीच्या बहुतेक वसाहती तिच्या उपनद्यांमध्ये आहेत. ही गोष्ट केवळ प्राचीन वसाहतीबाबत खरी नाही तर सध्याची परिस्थितीसुद्धा याहून वेगळी अशी नाही. सध्याची सर्व तालुक्यांची ठिकाणे, जिल्ह्याचे ठिकाण व मोठमोठाली गावे ही तापीवरती वसलेली नसून तिच्या उपनद्यांच्या खोऱ्यात आहेत. तापीवरती तुरळक प्रमाणात वस्ती होण्याची खालील प्रमुख कारणे आहेत.

(१) तापी नदी ही महाराष्ट्रातील सर्वांत मोठी नदी असून तिला अनेक उपनद्या येऊन मिळतात. त्यामुळे पावसाळ्यात या नदीला मोठमोठाले पूर येतात व त्यात गावेच्या गावे वाहून जातात. हा पुराचा धोका टाळण्यासाठी शक्यतो तिच्यापासून दूर अशा ठिकाणी वसाहती केल्या जातात.

(२) वर्षानुवर्षे येणाऱ्या पुरामुळे नदीच्या अतिशय भुसभुशीत असलेल्या

किनाऱ्याची फार मोठ्या प्रमाणात झीज होते व आजूबाजूंची चांगली सुपीक माती पाण्याबरोबर धुपून जाते. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात शेती करणे व कोणत्याही प्रकारच्या कृत्रिम साधनांनी शेतीला पाणीपुरवठा करणे जवळ जवळ अशक्यप्राय होऊन बसते.

(३) तापी नदी भूपृष्ठापासून जवळ जवळ १५ ते २० मीटर खोल वाहते, त्यामुळे किनाऱ्यावर वसलेल्या लोकांना नेहमीसाठी लागणाऱ्या पाण्याची ने-आण करणे फार जिकिरीचे होऊन बसते. या सर्व गोष्टींच्या विचाराअंती तापीवर तुरळक प्रमाणात वसाहती का झाल्या याचे आपोआप उत्तर मिळते.

याउलट गोष्ट तिच्या उपनद्यांच्या बाबतीत पाहायला मिळते.

(१) बहुतेक उपनद्या ह्या पश्चिम घाटात उगम पावतात व त्यामुळे त्यांना बारमाही पाणी असते.

(२) ह्या नद्या अरुंद पण खोल अशा घळीतून वाहतात व क्वचितच पुराचे पाणी किनाऱ्याबाहेर येते. त्यामुळे किनाऱ्यावर वसलेल्या वसाहतींना अजिबात धोका पोहचत नाही व आजूबाजूच्या सुपीक मातीची धूप होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(३) उपनद्या ह्या अरुंद असल्याकारणाने त्यावर लहान बंधारे बांधणे फारच सुलभ जाते. अशाप्रकारे कृत्रिम रीत्या शेतीला पाणीपुरवठा करणे सुलभ होते.

तापी खोऱ्यातील वसाहती तीन अशा वेगळ्या भौगोलिक रचनेत वसलेल्या आहेत.

(१) तापी नदीवरील वसाहती

(२) तापीच्या उपनद्यांमधील वसाहती.

(३) डोंगराच्या पायथ्याजवळील व नदीकिनाऱ्यापासून दूर वसलेल्या वसाहती.

(१) तापी नदीवरील वसाहती—

तापी नदीवरती तुरळक प्रमाणात वसाहती झाल्या हे मान्य आहे परंतु ज्या काही वसाहती झाल्या त्या अशा ठिकाणी झाल्या की जेथे सहजासहजी पुराचे पाणी पोहचणार नाही. अशी सुरक्षित ठिकाणे तापीच्या किनाऱ्यावरती फारच थोडी असल्याकारणाने तुरळक वसाहती झाल्या. सुरक्षित ठिकाणे, मुबलक सुपीक जमीन व भरपूर पाणी-पुरवठा यामुळे येथे झालेल्या वसाहती आकाराने मोठ्या प्रमाणात वाढल्या तसेच त्या पुन्हा पुन्हा एकापेक्षा जास्त संस्कृतींनी व्यापल्या गेल्या. तापी खोऱ्यातील त्या काळचे ज्याला शहर म्हणता येईल (Regional Centre) असे ठिकाण प्रकाशे हे तापी नदीच्याच उजव्या किनाऱ्यावरती वसलेले आहे. ही वसाहत जवळ जवळ १० हेक्टर एवढ्या जमिनीवरती पसरली असून ती ताम्रपाषाण युगीन संस्कृतीपासून ते थेट आतापर्यंत व्यापली गेली आहे. ही वसाहत तापी व गोमाई यांच्या संगमावरतीच वसलेली आहे. त्याचप्रमाणे इतर अनेक ताम्रपाषाण युगीन मोठाली गावे तापीवरतीच

वसलेली आहेत.

तापी नदीवरती राहणाऱ्या लोकांनी शेती फार मोठ्या प्रमाणात केली. याची प्रचीती पुढील वस्तुस्थितीवरून मिळते; लागवडीच्या किंवा सुगीच्या वेळी घरापासून दूर १ ते २ कि. मी. अंतरावर असणाऱ्या शेतीवरती वस्त्या करून राहतात त्यांना वाड्या म्हणतात. अशा वाड्या ताम्रपाषाणयुगीन काळात सुद्धा होत्या. किंबहुना ही रूढी तेव्हापासून आजपर्यंत कायम आहे. प्रत्येक मोठ्या ताम्रपाषाणयुगीन वसाहतीच्या १ ते ३ कि. मी. अंतरामध्ये अगदी लहान वसाहती आढळून येतात. अशा वस्त्या शक्यतो मुबलक प्रमाणात सुपीक जमीन आहे अशाच ठिकाणी झाल्या. ह्या वसाहती इतक्या लहान आहेत की साधारणतः जेमतेम १० ते १५ लोकांनी तेथे अल्पकाळ वस्ती केली असेल असे वस्तीच्या एकंदरीत विस्तारावरून व थरांच्या जाडीवरून वाटते. अमेरिकन पुरातत्त्वज्ञ होल व फ्लॅनरी[१३] यांनी सुद्धा इराणमधील आद्य शेतकऱ्यांच्या अशा लहान वस्त्यांना वाड्याच म्हटले आहे.

(२) उपनद्यांवरील वसाहती

सर्वांत जास्त म्हणजे जवळ जवळ ६० च्या आसपास वसाहती या उपनद्यांमध्ये वसलेल्या आहेत. जवळ जवळ या सर्व वसाहती म्हणजे मध्यम आकाराची गावे होती. त्यांची व्याप्ती साधारणपणे १ ते २ हेक्टर एवढी असे. ह्या वसाहती नदीच्या अगदी जवळ वसलेल्या आढळतात. या भागात तापीप्रमाणे अतिशय सुपीक अशी गाळाची जमीन मर्यादित आहे, तसेच गर्द काळ्या रंगाची जमिनीची कमतरता असल्याकारणाने येथील वसाहतींची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढू शकली नाही व म्हणूनच मध्यम आकाराची गावे येथे आढळून येतात.

एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करणे येथे रास्त ठरेल. निम्म्याहून जास्त वसाहती ह्या नदीच्या कुंडलाकार वळणात वसलेल्या आढळून येतात. त्याला अनेक कारणे आहेत.

(१) नदीच्या कुंडलाकार वळणात जागा भरपूर असल्याकारणाने पुराचे पाणी संपूर्ण वळणात पसरते व त्यामुळे नदीच्या किनाऱ्याबाहेर शक्यतो पसरत नाही. म्हणूनच किनाऱ्यावरती वसलेल्या गावाला सहसा धोका पोहोचत नाही. अशा प्रकारे एका बाजूने तरी वस्तीचे संरक्षण होते.

(२) जेथे नदी वळण घेते त्या ठिकाणी वळणात मोठमोठाले डोह तयार होतात. त्यामुळे डोहात साठलेले पाणी, नदी जरी उन्हाळ्यात आटली तरी वर्षभर पुरते.

(३) मोठमोठाले डोहात मासे व अन्य जलचर प्राणी मोठ्या प्रमाणात वस्ती करतात. त्यामुळे मुबलक प्रमाणात जलचर प्राण्यापासून मिळणाऱ्या अन्नाचा पुरवठा होतो. तसेच नदी आटल्यावर जंगली प्राणी व इतर पाळीव प्राण्यांसाठी असे डोहच

प्रमुख पाणवठा म्हणून उपयोगात येतात. या सर्व गोष्टींचा विचार करूनच आद्य शेतकऱ्यांनी शक्यतो नदीच्या वळणात राहणे पसंत केले असावे.

(३) डोंगराच्या पायथ्याजवळील वसाहती

जवळ जवळ २० च्या आसपास वसाहती ह्या अशा ठिकाणी वसलेल्या आहेत की जेथे वर्षभर पुरेल असा पाण्याचा पुरवठा नाही की शेतीयुक्त अशीच सुपीक जमीन नाही. अशा वस्त्या शक्यतो टेकड्यांच्या पायथ्याला वसलेल्या असून आजूबाजूंच्या टेकड्या व खडकाळ जमीन शेतीसाठी उपयुक्त नसली तरी भरपूर प्रमाणात चारा मात्र उपलब्ध करून देतात. ह्या ठिकाणी वसलेल्या वसाहती ह्या आकाराने अगदी लहान म्हणजे १/२ हेक्टरपेक्षा कमी जागा व्यापणाऱ्या असून शक्यतो लहान नाल्याजवळ वसलेल्या आढळतात. त्यांच्या एकंदर अवशेषांवरून तेथे अल्पकाल वस्ती झाली हे सिद्ध होते.

वस्तीच्या लहान आकारावरून, तेथे अल्पकाल झालेल्या वास्तव्यावरून तसेच सभोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीवरून असे वाटते की, येथील लोक हे पूर्णतः शेतीवर अवलंबून नसून मेंढपाळीवर अधिक प्रमाणात अवलंबून असावेत. शेळ्यामेंढ्यांना तसेच गुरांना चरण्यासाठी आवश्यक तो चारा येथे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. आजूबाजूला जंगल असल्याकारणाने फळफळावळींची कमतरता भासली नसेल. एक ठिकाणचा चारा संपल्यावर त्यांनी दुसऱ्या ठिकाणी जेथे मुबलक प्रमाणात चारा उपलब्ध आहे अशा ठिकाणी प्रयाण केले असावे. म्हणूनच अशा वस्त्या लहान आकाराच्या असून तेथे अल्पकाळ वास्तव्य झालेले आढळते. अशा प्रकारच्या वस्त्या ह्या जास्त करून जोर्वे संस्कृतीच्या वेळच्या आढळतात.

मी या संदर्भात सध्याच्या धनगर जमातीचा अभ्यास केला, व असे आढळून आले की, ही धनगर जमात उन्हाळ्यात व हिवाळ्यात मेंढ्यांचे मोठमोठाले कळप घेऊन गावाबाहेर पडतात व चाऱ्याच्या शोधात ५० एक मैलापर्यंत दूर फिरतात, व जेथे मुबलक प्रमाणात चारा उपलब्ध असेल अशा ठिकाणी दोन ते तीन महिने वातव्य करतात. त्यांच्याबरोबर चार-पाच पुरुष मंडळी व एक-दोन स्त्रिया स्वयंपाक करण्यासाठी असतात. एका लहानशा नाल्याजवळ दोन-तीन गोल आकाराच्या झोपड्या उभारून हे लोक राहतात. चारा संपल्यानंतर ते दुसऱ्या ठिकाणी जेथे चारा असेल तेथे स्थलांतर करतात, व नंतर पावसाळ्यात आपल्या गावी परत येतात. कदाचित अशा प्रकारच्या वसाहती ताम्रपाषाणयुगात झाल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आता असा प्रश्न निर्माण होतो की, एवढी सुपीक जमीन उपलब्ध असताना जोर्वे संस्कृतीच्या लोकांनी हा खडतर मार्ग का स्वीकारला. आतापर्यंत मिळालेल्या सर्व

ताम्रपाषाणयुगीन वसाहती नकाशावर दर्शविल्यानंतर एकंदरीत वितरण रचनेवरून असे दिसते की जो भाग माळव्या संस्कृतीनी व्यापला होता तेथे जोर्वे संस्कृतीची क्वचितच वसाहत मिळते. माळवा संस्कृतीच्या लोकांनी तापीतील चांगल्या सुपीक भागात वसाहत केली. ज्या वेळी जोर्वे लोक तापीत आले त्या वेळी पांजरेच्या खोऱ्यात थोडासा भाग सोडल्यास त्यांना सुपीक अशी जमीन शिल्लक नव्हती, व त्यामुळेच त्यांना जी काही जमीन शिल्लक होती तेथे वसाहती करणे भाग पडले. तेथे शेती करणे फारच त्रासदायक असल्यामुळे त्यांनी मेंढपाळाचा धंदा सुरू केला व त्यामुळेच त्यांच्या वसाहतींना काहीसे भटके स्वरूप प्राप्त झाले. तापीमधील जोर्वे व माळवा संस्कृती समकालीन होत्या हे यावरून सिद्ध होते.

जोर्वे व माळवा संस्कृती ह्या समकालीन होत्या यासाठी आणखी एक महत्त्वाचा पुरावा उपलब्ध आहे. जोर्वे संस्कृतीच्या खापराच्या भांड्यावर माळवा संस्कृतीचा जबर-दस्त पगडा पडलेला दिसतो. विशेषतः जोर्वे संस्कृतीच्या मातीच्या भांड्याची जडण घडण त्यावरील नक्षीकाम व काही आकार हे माळव्या संस्कृतीच्या भांड्याशी बरेचसे मिळते-जुळते आहेत.[१४]

References

(1) *Indian Archaeology : A Review* 1957–58 to 1968–69.

(2) *Gazetteer of Bombay Presidency (Khandesh)* 1880, Vol. 12, Government of India.

(3) Thapar, B. K. 1964. " Prakashe 1955 : A Chalcolithic site in the Tapi Valley " *Ancient India Nos* 20–21 : 1–167.

(4) *India Archaeology A Review* 1959–60, pp. 34–37.

(5) Dhavalikar, M. K. 1975. " Settlement Archaeology of Inamgaon. " *Puratattva* No 8 : 44–54.

(6) *India Archaeology A Review* 1974–75 To 1978–79.

(7) Dhavalikar, M.K. 1978. Jorwe pottery : A statistical study BDCRI : Vol and A. R. Marathe XXVIII, Nos 1–4 : 17–22

(8) Sali, S. A. 1964. " A new ceramic of the Chalcolithic from Dhule District. Maharashtra " in *Journal of the Asiatic Society of Bombay* Vol – 38 : 207–210.

(9) Dhavalikar M. K. 1979. " Early farming Cultures of the Deccan " in *Essays in Indian Protohistory* D.P. Agrawal

and D. K. Chakrabarty (eds)
Delhi, pp. 247–65.

(10) Shinde Vasant, 1985. "Kaothe : A Late Harappan Settlement in the Central Tapi Basin" DDCRI Vol 44 : 173–177.

(11) Sankalia H. D., Deo S. B. and Ansari, Z. D. 1971 *Chalcolithic Navdatoli* (Poona).

(12) Willey G. R. 1953. *Prehistoric Settlement Patterns in the Vira Valley Peru*, Bureau of American Ethnogogy No.155.

(13) Hole, Frank and Flannery, Kent. V., "The prehistory of southwestern Iran–A preliminery survey" in *Proceeding of the Prehistoric Society* for 1967. (New series) Vol. XXXIII. pp. 147–206

(14) Shinde Vasant 1984. *Early Settlements in the Central Tapi Basin*. Unpublished Ph. D. Thesis, University of Poona.

ॐ

Agrarian Conditions in Maharashtra, 1740-1790

[A study of Prants of Poona-Junnar, Satara, Wai, Mawal and Konkan territories of the Maratha Country].

Dr. T. T. Mahajan

The attempt to study the agrarian conditions of Maharashtra in the 18th Century at the regional level seems to be neglected by the scholars of Maratha history. Fortunately, available contemporary records enable us to study the agrarian conditions of the region comprising prants like Poona-Junnar, Satara, Wai, Mawal and Konkan territories during the period 1740–1790. The object of this paper is to describe the general conditions of the peasantry in the Maratha Country with the help of the analysis of the basic notable factors such as the state revenue demand, the crop-rates, rate of rent or demand of feudatories, usury capital of money–lender, average returns from cultivation, productivity of land, cost of production, prices of agricultural commodities etc.

Class Composition of Agricultural Population in Medieval Maharashtra.

Unfortunately, we have no data about the agricultural population of the Maratha country in the 18th century and hence the percentage of agricultural population cannot be stated accurately. The agricultural population of medieval Maharashtra can be roughly divided into the following categories :

(1) Mirasdars or landholders (Thalkaries) or peasant proprietor or landowners.

(2) Mokasi people, i. e. holders of a rent–free lands from Government.

(3) Uparis – who cultivated the lands of others on rent and can be called as land tenures.[1]

(4) Non–cultivating landlords or feudatories.

(5) Moneyl-enders.
(6) Landless labourers, etc.

Types of Tenants :

The peasants overburdened with debt[2] mortgaged their lands and cultivated the lands of others on fixed rent. Sometimes, the cultivators who could not pay revenue or earn their subsistence had to borrow loan and mortgage the lands in lieu of exhorbitant rate of interest[3]. Thus the peasants with no lands or who mortgaged their lands for debt could work either as an agricultural labourer or cultivated lands of others on rent. They worked on the lands of Jagirdars or Mirasdars by paying fixed produce rent or fixed cash.[4] In Batai system, the peasants cultivated the lands of Government on fixed rent either in cash or in kind. The government, out of the total produce deducted some portion of grains for seeds and also for other necessary charges and left 1/2 or sometimes only 1/3 of the crop produce to the peasants.[5]

Another class of tenants who were known as uparis held government land under the management of Mamlatdars.[6] and rent collected from them was very high. For example, the rent charged on the tenants who cultivated lands in pargana Deher Gorath and Korkada in prant Kalyan was fifty rupees for certain bighas of land. But the rent was so high that the tenants left that pargana and went into talukas of Trimbak and Ratangad where they could obtain as many bighas of land as they cultivated in previous pargana for twenty-five rupees.

In such cases, it is found that the rent charged was two times higher than the usual rates. In other areas, usually the rent was as high as one and half or two times the land revenue demand. Other tenants who cultivated that land of others on rent were known as Kunbis. The rent taken from the Kunbis was mostly in form of share cropping. For example, a kunbi rented a field from Vithal Bhat, Tamhankar in tarf Kharepatan in Prant Rajapur on the fifty percent of the produce[7] which was a high rate of rent and also indicates the exploitation of peasants by the land-owner.

Impact of the money-lender's hold on peasantry :

In Maharashtra of the 18th century the money-lending business was quite widespread. In cities, like Poona and others, the number of bankers was quite large. The records reveal that in all Prants of Maratha empire indebtedness of the people was quite considerable.[8] The transaction in the day-book account of Tulshibagwale and other bankers, shows that in most of cases, the lands were mortgaged against debt[9] and many of the debtors totally lost their lands to their creditors.[10] Thus, for example, a cultivator in Dhalewadi in tarf Karhepathar of Poona prant due to the heavy debt, sold his seven bighas of irrigated lands together with well and trees, at very low rate to the creditor.[11] The impact of the hold of money-lender on the producer was worthy to note. The moneylender usurped the surplus produce from the agriculture. The cultivator was forced to sale his produce to the banker at much below the market price. The money-lender gave advances to the peasants at the time of their revenue fell due on condition that they cultivated a particular crop (rice) and supplied it to the former at a fixed rate which was usually very low.

For example, a cultivator, Dhuloji Jagannath Siwane was thus forced by the creditor to agree to pay to the latter, one seer of rice more in addition to the market price of rice for a rupee.[12] Sometimes, the creditor used to advance the loan to the producer on condition that he should sell that produce to the creditor at the fixed rate as mentioned in loan bond or Karjakhat. But if the price rate of that commodity came down, the latter had to sell it to the former at the decreased rate, on the contrary, it was to be sold at fixed rate when its price increased.[13] These evidences are enough to show that how the bankers exercised influence over the prices of agricultural commodities. In addition to this, the money-lenders charged exhorbitant rate of interest varying from 18 to 48 percent.[14] In fact, through the system of advancement of loan to peasants, the creditor exercised his control over peasantry in form of mortgage of land or extraction of a large surplus from producers. The money-lenders like Vaidyas to whom the Peshwa govt. granted inam villages, collected other cesses, in addition to revenue tax

such as Gadepatti (Cart tax) and Kharchpatti (Expense tax) from the peasants in their inam villages[15] In this context, it can be said that money-lenders' usury capital (in form of loan) provided to agriculture in Maharashtra, played the role a parasite and earned a huge profit by extracting a large share from agricultural produce.

Revenue demand of the State :

The lands in Maharashtra under the Peshwas can be classified as under :

(1) Jirayat[16] (dry) (2) Bagayit[17] (Wet). Again irrigated lands were of two types, 1 Patsthal[18] – lands irrigated by Canal water, 2 Motsthal[19] – lands irrigated by well water. The lands were classified on the fertility also and were styled as – 1 Awwal (Superior), 2 Dum – ordinary, 3 Sim – inferior.[20] Thus, the revenue assessment was made on the principle of the fertility of lands and kind of soil and mode of supply of water. We find no uniformity all over the Maratha empire in revenue system. In different prants of the empire there were different rates of assessment and distinguished methods of assessment and different land tenures.

Table I

Harvest	Crops	Area	Kind of soil	In Rupees/maunds/ Payalis per Bigha.
Kharif	Rice	Tarf Haveli Pal (Junnar prant)	—	10 Maunds
	Sugar-cane	,,	—	5/– Rupees.
	Jwari	Mauje Kathapur (Wai Prant)	Supperior	3¼ Maunds – 1 Payali
			Ordinary	2½ ,, - 2 Payali
			Inferior	1¾ ,, - 1 ,,
Rabi	Summer-Crops			
	Wheat	,,	,,	Rs. 1½
	Gram	,,	—	Rs. 1½
	Vegetables	,,	—	Rs. 2

Now, we may pass on the statistics of revenue rates on individual crops in prants of Wai and Junnar of the year 1740-41. The rate of revenue demand per bigha in these prants were as follows[21] :

An examination of the rate of revenue demand and amount collected per bigha in Prant of Junnar in terms of rupees shows that the revenue rates per bigha on the crops in Prant of Wai were of slightly higher than that in Junnar prant. The variation of rates indicates the quality of land on which the state demand was fixed. The lower rate of demand indicates the inferior land and higher demand superior land. It appears from the above table I, that the rates of Kharif crops per bigha were much higher than those of rabi crops. And this can be substantiated with the following table II of revenue rates of the tarf Nane Maval of the year 1747-48.[22]

Table II

Crops	Rates in payalis per rupee	Area
Rabi Crops		
Wheat	3 Payalis	Tarf Nane Maval
Gram	3 Payalis	,,
Kharif Crops		
Cereals	6 Payalis	Paun Maval
Nachana	6 Payalis	,,
Rice	6 Payalis	,,
Wari	6 Payalis	,,

The rates of Cash crops per bigha were as shown in the table III.

Table III

Crops	Area	Rate in Rupees / anna / per maund	Year
Sugar-cane	Tarf Haveli	5 Rupees[23]	1740-41
Sugar-cane	Chandwad pargana	10 Rupees[24]	1749-50
Sugar-cane	Neral Taluka	5 Rupees[25]	1772-73
Til	Nane Maval	Rs. 2-8 annas per maund[26]	1743 44
Til	"	Rs. 3-8 annas per maund[27]	1745-46
Jute	Neral	5 Rupees[28]	1772-73
Coconut trees & land	"	8 Annas for every tree.	1772-73
